असा. क्र. २७ रजिस्टर्ड नं. एमएच/एमआर/साऊथ-२२९/२००६-०८

# महाराष्ट्र शासन राजपत्र

असाधारण

प्राधिकृत प्रकाशन

सोमवार, मे १२, २००८/वैशाख २२, शके १९३०

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.

## भाग चार

**महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम.**

**अनुक्रमणिका**



| | पृष्ठे |
|---|---|
| **सन २००८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २२.**—मुंबई महानगरपालिका अधिनियमामध्ये तात्पुरत्या सुधारणा करण्याकरिता अधिनियम .. .. .. | २५३-२५५ |



दिनांक ११ मे २००८ रोजी मा. राज्यपालांनी संमती दिलेला महाराष्ट्र विधानमंडळाचा पुढील अधिनियम माहितीसाठी, याद्वारे, प्रसिद्ध करण्यात येत आहे.

**अ. मा. शिंदेकर,**
सचिव,
महाराष्ट्र शासन,
विधी व न्याय विभाग.

### सन २००८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २२.

(मा. राज्यपालांची संमती मिळाल्यानंतर "**महाराष्ट्र शासन राजपत्रात**" दिनांक १२ मे २००८ रोजी प्रथम प्रसिद्ध केलेला अधिनियम.)

**मुंबई महानगरपालिका अधिनियमामध्ये तात्पुरत्या सुधारणा करण्याकरिता अधिनियम.**

१८८८ चा मुंबई ३. **ज्याअर्थी**, यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांसाठी, मुंबई महानगरपालिका अधिनियमामध्ये तात्पुरत्या सुधारणा करणे इष्ट आहे ; त्याअर्थी, भारतीय गणराज्याच्या अठ्ठावन्नाव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

**१.** (१) या अधिनियमास, मुंबई महानगरपालिका (तात्पुरती सुधारणा) अधिनियम, २००७ असे म्हणावे. संक्षिप्त नाव व कालावधी.

(२) तो राजपत्रात प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून तीन वर्षांच्या कालावधीकरिता अंमलात राहील आणि त्यानंतर तो समाप्त होईल. हा अधिनियम समाप्त झाल्यानंतर, जणू काही तो महाराष्ट्र अधिनियमाद्वारे निरसित करण्यात आलेला आहे असे समजून मुंबई सर्वसाधारण वाक्खंड अधिनियम, १९०४ याचे कलम ७ लागू होईल. (१९०४ चा मुंबई १.)



[**किंमत :** रुपये १५-००]

सन १८८८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३ यामध्ये तात्पुरती सुधारणा.

**२.** हा अधिनियम अंमलात असण्याच्या काळात, मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील दिनांक २५ मार्च १९९१ पूर्वी बांधण्यात आलेल्या आणि इमारतीचा भोगवटा करण्यासाठीची आयुक्ताची परवानगी न घेता ताब्यात घेण्यात आलेल्या इमारतीचे भोगवटा प्रमाणपत्र देण्याकरिता, मुंबई महानगरपालिका अधिनियमाच्या तरतुदी पुढील फेरफारांसह लागू होतील :— १८८८ चा मुंबई ३.

(एक) कलम २५९अ मध्ये, पोट-कलम (३) नंतर, पुढील पोट-कलम समाविष्ट करण्यात येईल :—

" (३अ) पोट-कलम (३) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, दिनांक २५ मार्च १९९१ पूर्वी बांधण्यात आलेली व इमारतीचा भोगवटा करण्यासाठी कलम ३५३अ अन्वये घ्यावयाची आयुक्ताची परवानगी न घेता ताब्यात घेण्यात आलेल्या इमारतीच्या भोगवटादारांनी स्थापन केलेली महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० अन्वये नोंदणी केलेली सहकारी गृहनिर्माण संस्था किंवा अशा सहकारी गृहनिर्माण संस्थांचा महासंघ अथवा व्यक्तिगत मालकी असणाऱ्या सदनिका असलेली अशी कोणतीही इमारत अथवा कंपनी अधिनियम, १९५६ अन्वये विधिसंस्थापित केलेली व मर्यादित दायित्व असणारी अशी कंपनी, अथवा त्या इमारतीच्या भोगवटादारांनी स्थापन केलेल्या व्यक्तींचा संघ किंवा कोणतेही तदर्थ मंडळ यांना एक लायसनधारक नळकारागीर (प्लंबर) नेमता येईल आणि तो, अगोदरच्या नळकारागीराने केलेल्या कामाची तपासणी करून ते प्रमाणित करणारे प्रमाणपत्र आयुक्ताला सादर करील. लायसनधारक नळकारागीराने या पोट-कलमान्वये दिलेले प्रमाणपत्र हे, सर्व प्रयोजनांसाठी, लायसनधारक नळकारागीराने पोट-कलम (३) अन्वये दिलेले प्रमाणपत्र असल्याचे मानण्यात येईल. "; १९६१ चा महा. २४. १९५६ चा १.

(दोन) कलम २९९ मधील, पोट-कलम (१) मध्ये, पुढील स्पष्टीकरण जादा दाखल करण्यात येईल :—

" **स्पष्टीकरण.—** सार्वजनिक रस्त्याच्या नियमित रेषेत येत असलेल्या आणि दिनांक २५ मार्च १९९१ पूर्वी बांधण्यात आलेल्या व इमारतीचा भोगवटा करण्यासाठी कलम ३५३अ अन्वये घ्यावयाची आयुक्ताची परवानगी न घेता ताब्यात घेण्यात आलेल्या एखाद्या इमारतीने ताब्यात न घेतलेल्या अशा खुल्या जमिनीचे संपादन करण्याच्या प्रयोजनांसाठी, उक्त जमीन व इमारतीचा ' मालक ' याचा अर्थ, अशा इमारतीच्या भोगवटादारांनी स्थापन केलेली महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० अन्वये नोंदणी केलेली सहकारी गृहनिर्माण संस्था किंवा सहकारी गृहनिर्माण संस्थांचा महासंघ अथवा व्यक्तिगत मालकी असणाऱ्या सदनिका असलेली कोणतीही इमारत अथवा कंपनी अधिनियम, १९५६ अन्वये विधिसंस्थापित केलेली, मर्यादित दायित्व असणारी कंपनी अथवा त्या इमारतीच्या भोगवटादारांनी स्थापन केलेला व्यक्तींचा संघ किंवा कोणतेही तदर्थ मंडळ, असा आहे. "; १९६१ चा महा. २४. १९५६ चा १.

(तीन) कलम ३५३अ मध्ये, पोट-कलम (१) नंतर, पुढील पोट-कलम जादा दाखल करण्यात येईल :–

"(१अ) पोट-कलम (१) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, दिनांक २५ मार्च १९९१ पूर्वी बांधण्यात आलेली व इमारतीचा भोगवटा करण्यासाठी कलम ३५३अ अन्वये घ्यावयाची आयुक्ताची परवानगी न घेता ताब्यात घेण्यात आलेल्या इमारतीच्या भोगवटादारांनी स्थापन केलेली महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० अन्वये नोंदणी केलेली सहकारी गृहनिर्माण संस्था किंवा अशा सहकारी गृहनिर्माण संस्थांचा महासंघ अथवा व्यक्तिगत मालकी असणाऱ्या सदनिका असलेली अशी कोणतीही इमारत अथवा कंपनी अधिनियम, १९५६ याच्या तरतुदींअन्वये विधिसंस्थापित केलेली व मर्यादित दायित्व असणारी कोणतीही अशी कंपनी अथवा त्या इमारतीच्या भोगवटादारांनी स्थापन केलेल्या व्यक्तींचा संघ किंवा कोणतेही तदर्थ मंडळ हे, लायसनधारक सर्वेक्षकाची किंवा इमारत बांधण्यासाठी या कलम ३४२ मध्ये वर्णन केलेले कोणतेही काम पार पाडण्यासाठी आयुक्ताने मान्यता दिलेल्या व्यक्तीची नियुक्ती करील आणि ती असा लायसनधारक सर्वेक्षक किंवा अशी मान्यताप्राप्त व्यक्ती, उक्त जागेची तपासणी केल्यानंतर काम पूर्ण झाल्याबाबतची लेखी नोटीस, नमुना "टी" मधील प्रमाणपत्रासह आयुक्ताला त्याच्या कार्यालयात पोचते करील वा पाठवील किंवा पोचते करण्याची वा पाठवण्याची व्यवस्था करील. लायसनधारक सर्वेक्षकाने दिलेले किंवा इमारत बांधण्यासाठी वा कलम ३४२ मध्ये वर्णन केलेले कोणतेही काम पार पाडण्यासाठी आयुक्ताने मान्यता दिलेल्या व्यक्तीने या कलमान्वये दिलेले प्रमाणपत्र हे, सर्व प्रयोजनांसाठी, पोट-कलम (१) अन्वये दिलेले प्रमाणपत्र असल्याचे मानण्यात येईल.".

१९६१ चा महा. २४.

१९५६ चा १.

रजिस्टर्ड नं. एमएच/एमआर/साऊथ-२२९/२००६-०८

# महाराष्ट्र शासन राजपत्र

असाधारण

प्राधिकृत प्रकाशन

सोमवार, मे १२, २००८/वैशाख २२, शके १९३०

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.

## भाग आठ

महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम आणि विधि व न्याय विभागाकडून आलेली विधेयके (इंग्रजी अनुवाद).

In pursuance of clause (3) of article 348 of the Constitution of India, the following translation in English of the Mumbai Municipal Corporation (Temporary Amendment) Act, 2007 (Mah. Act No. XXII of 2008), is hereby published under the authority of the Governor.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

A. M. SHINDEKAR,
Secretary to Government,
Law and Judiciary Department.

## MAHARASHTRA ACT No. XXII OF 2008.

*(First published, after having received the assent of the Governor, in the "Maharashtra Government Gazette" on the 12th May 2008).*

An Act to temporarily amend the Mumbai Municipal Corporation Act.

Bom. III of 1888. WHEREAS it is expedient to temporarily amend the Mumbai Municipal Corporation Act, for the purposes hereinafter appearing ; it is hereby enacted in the Fifty-eighth Year of the Republic of India as follows :—

Short title and duration.

**1.** (*1*) This Act may be called the Mumbai Municipal Corporation (Temporary Amendment) Act, 2007.

(2) It shall remain in force for a period of three years from the date of its publication in the *Official Gazette*, and shall then expire. Section 7 of the Bombay General Clauses Act, 1904, shall apply upon the expiry of this Act, as if it had then been repealed by a Maharashtra Act. Bom. I of 1904.

Temporary amendment of Bom. III of 1888.

**2.** During the period this Act remains in force, for grant of certificate to occupy the building situated in the area of the Mumbai Municipal Corporation, constructed before the 25th March 1991 and occupied without obtaining the permission to occupy the building from the Commissioner, the provisions of the Mumbai Municipal Corporation Act, shall apply with the following modifications, namely :— Bom. III of 1888.

(*i*) in section 259A, after sub-section (*3*), the following sub-section shall be inserted, namely :—

" (*3A*) Notwithstanding anything contained in sub-section (*3*), a co-operative housing society or a federation of co-operative housing societies registered under the Maharashtra Co-operative Societies Act, 1960 or any condominium or a company incorporated under the Companies Act, 1956 with limited liability or an association of persons or any *ad hoc* body formed by the occupants of the building constructed before the 25th March 1991 and occupied without obtaining the permission to occupy the building from the Commissioner under section 353A, may appoint a licensed plumber who shall inspect and submit to the Commissioner a certificate certifying the work carried out by the earlier plumber. The certificate given by the licenced plumber under this sub-section shall, for all purposes, be deemed to be the certificate given by the licenced plumber under sub-section (*3*).";  Mah. XXIV of 1961. 1 of 1956.

(*ii*) in section 299, to sub-section (*1*), the following *Explanation* shall be added, namely :—

"*Explanation.*—For the purposes of acquisition of open land lying within the regular line of a public street, and not occupied by a building constructed before the 25th March 1991 and occupied without obtaining the permission to occupy the building from the Commissioner under section 353A, 'owner' of the said land or building means a co-operative housing society or a federation of co-operative housing societies registered under the Maharashtra Co-operative Societies Act, 1960 or any condominium or a company incorporated under the Companies Act, 1956 with limited liability or an association of persons or any *ad hoc* body formed by the occupants of the building."; Mah. XXIV of 1961. 1 of 1956.

(*iii*) in section 353A, after sub-section (*1*), the following sub-section shall be added, namely :—

"(*1A*) Notwithstanding anything contained in sub-section (*1*), a co-operative housing society or a federation of co-operative housing societies registered under the Maharashtra Co-operative Societies Act, 1960 or any condominium or a company incorporated under the Companies Act, 1956 with limited liability or an association of Mah. XXIV of 1961. 1 of 1956.

persons or any *ad hoc* body formed by the occupants of the building constructed before the 25th March 1991 and occupied without obtaining the permission to occupy the building from the Commissioner under section 353A, shall employ a licenced surveyor or person approved by the Commissioner to erect a building or to execute any such work as is described in section 342, who shall after inspecting the said premises deliver or send or cause to be delivered or send to the Commissioner at his office, notice in writing of such completion accompanied by certificate in Form "T". The certificate given by the licenced surveyor or person approved by the Commissioner to erect a building or execute any such work as is described in section 342, under this sub-section shall, for all purposes, be deemed to be the certificate given under sub-section (*1*).".

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई